# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५३५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२४/०८/२०१६

**१) सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभे करून मिळून आल्याने गुन्हा नोंद. :—**

**अ)** दिनांक २३/०८/०१६ रोजी १३.०० वा. दरम्यान मिनीडोअर गाडी क्र. एमएच ३६/३८७७ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन साकोली बस स्थानक समोर येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २३/०८/०१६ रोजी १३.३० वा. दरम्यान. मिनीडोअर गाडी क्र. एमएच ३६/३५७६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन साकोली बस स्थानक समोर येथे सार्वजनिक रोडवर ऊभे करून येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जीवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभे करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पोहवा. निंबार्ते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) सर्पद्वंश केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—**

दिनांक ०४/०८/२०१६ रोजी ०१.३० वा. दर. यातील मृतक गजानन लाला सेलोकर वय ५५ वर्ष, रा. दवडीपार बेला हा दि. २९/०७/२०१६ ला रात्री झोपुन उठुन लघवी करण्या करीता बाथरुममध्ये गेला असता त्यास सापाने डावे पायाचे घोटेवर चावा घेतल्याने प्रकृती खराब झाली. त्यास उपचारा करीता प्रथम सा. रु. भंडारा येथे नेवुन पाथमीक उपचार करुन रेफर झाल्याने त्यास नंतर सुअरटेक हॉस्पीटल धंतोली नागपुर येथे उपचार करुन तेथुन पुन्हा दि. २/०८/२०१६ ला मेडीकल कॉलेज नागपुर येथे उपचारास भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोलीस स्टेशन अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मेश्राम पो. स्टे. भंडारा येथे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. गि—हेपुंजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक २२/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनांकरीता ०४ तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व इतर वाहनांवरती १०७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र.८८०५६१९११९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.